गुरूवार
१६
जुलै २०२६

वर्ष १९ वे
अंक - १७१
पान - ६
किंमत - ४ रूपये

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

# दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

संपादिका : सौ. सुशीला किसन हासे (बी. ए.)
संस्थापक : किसन भाऊ हासे (बी. जे.)
कार्यकारी संपादक : सुदीप किसन हासे (एम.ई.)

RNI No. MAHMAR/2007/24252
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25







दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25






अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १७१। किंमत - ५ रू. संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) गुरूवार १६/०७/२०२६ । पान - २





# नगरपरिषदेचा अतिक्रमणांवर बुलडोझर

## शिवाजी महाराज पुतळा-चावडी चौक मार्ग झाला मोकळा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहरातील वाहतूक कोंडीला कारणीभूत ठरत असलेल्या अतिक्रमणांविरोधात नगरपरिषदेने बुधवारी मोठी कारवाई करत शिवाजी महाराज पुतळा ते चावडी चौक या अत्यंत वर्दळीच्या मार्गावरील अतिक्रमणे हटवली. नगरपरिषदेचे मुख्याधिकारी दयानंद गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि शहर पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या पोलीस बंदोबस्तात ही मोहीम राबविण्यात आली.

शिवाजी महाराज पुतळा ते चावडी चौक हा शहरातील बाजारपेठ, व्यापारी संकुले आणि नगरपरिषद कार्यालयाकडे जाणारा प्रमुख मार्ग आहे. मात्र गेल्या अनेक वर्षांपासून या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना

### वाहतूक कोंडीला कारणीभूत ठरणारी अतिक्रमणे हटवली

व्यावसायिकांनी दुकानांसमोर पायऱ्या, खाटा, जाहिरात फलक तसेच विविध साहित्य ठेवून अतिक्रमण केले होते. याशिवाय काही परप्रांतीय विक्रेत्यांनी हातगाड्या, टपऱ्या आणि फेरी व्यवसायाच्या माध्यमातून रस्त्याचा मोठा भाग व्यापल्याने वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण होत होता.

परिणामी, एखादे चारचाकी वाहन या मार्गावर आले की संपूर्ण वाहतूक ठप्प होत होती. दुचाकी आणि चारचाकी वाहनचालकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत होता. अनेकदा किरकोळ वाद, गोंधळ आणि वाहतूक कोंडीची परिस्थिती निर्माण होत होती.

या परिसरात कापड, सराफा, जनरल स्टोअर्ससह विविध व्यावसायिक आस्थापना मोठ्या संख्येने आहेत. त्यामुळे आग, अपघात किंवा अन्य आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास अग्निशमन (पान ३)

# सर्व बातम्या तथ्यहीन

## सुप्रिया सुळे आणि जयंत पाटलांचे स्पष्टीकरण

मुंबई (वृत्तसंस्था)

संसदेच्या आगामी पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर 'मतदारसंघ पुनर्रचना' (डिलिमिटेशन) विधेयकाला राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष पाठिंबा देणार असल्याच्या चर्चा माध्यमांमध्ये रंगल्या होत्या. मात्र, या सर्व चर्चा केवळ 'सूत्रांच्या' आधारे असून, पक्षाने अद्याप कोणतीही अधिकृत भूमिका घेतलेली नाही, असा मोठा खुलासा पक्षाच्या कार्याध्यक्षा आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी केला आहे. मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी या विधेयकामागचा इतिहास, अमित शहांचा प्रस्ताव आणि 'इंडिया' आघाडीची भूमिका यावर सविस्तर प्रकाश टाकला.



सुळे म्हणाल्या, नवे डिलिमिटेशन बिल अद्याप आमच्या हातात आलेले नाही. जोपर्यंत नवीन बिल अधिकृतपणे समोर येत नाही, तोपर्यंत त्यावर कोणतीही प्रतिक्रिया देणे घाईचे ठरेल. ते विधेयक आल्यावर २४ तासांत त्याचा सखोल अभ्यास करूनच आम्ही आमची भूमिका मांडू.

माझ्या मतदारसंघातील नगराध्यक्षांना अपात्र ठरवण्याचा निर्णय चुकीचा झाला आहे, हे मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देण्यासाठीच मी त्यांची भेट घेतली. माझी त्यांच्याकडे इतर कोणतीही कामे नव्हती. आम्ही सर्व जण खंबीरपणे शरद पवार यांच्यासोबतच आहोत. त्यामुळे एनडीए किंवा मला अर्थमंत्रीपद मिळणार असल्याच्या चर्चांमध्ये काडीचेही तथ्य नाही, असे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी म्हटले आहे. (पान ४)

# यंदा ५ कोटी लिटर अतिरिक्त पाणीसाठा होणार : हरिभाऊ गिते

युवावार्ता (प्रतिनिधी)

तळेगाव दिघे - 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' ही महाराष्ट्र शासनाची एक अत्यंत महत्त्वाची जलसंधारण योजना आहे. या योजनेंतर्गत संगमनेर तालुक्यातील पळसखेडे येथे सुरू असलेल्या गाळ काढण्याच्या कामाला नाशिक जलसंधारण विभागाचे मुख्य अभियंता हरिभाऊ गिते यांनी भेट देत पाहणी केली. पळसखेडे तलावात यंदा ५ कोटी लिटर अतिरिक्त पाणीसाठा होणार असल्याचे गिते यांनी सांगितले.

योजनेंतर्गत अतिशय



चांगले काम चालू असल्याने अभियंता गिते यांनी समाधान व्यक्त केले. सदर काम वेळेत पूर्ण करत 'अवनी ग्रामीण ॲप' मध्ये गाळाची नोंदणी वेळेत करण्याचे आदेश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

प्रतिष्ठानतर्फे यावेळी कारभारी दादा शिवार गावतलावानजीक वृक्षारोपण करण्यात आले.

संगमनेरचे उपअभियंता विनायक पंडोरे, अभियंता भारत कोळी, संतोष आहेर, पळसखेडे ग्रामपंचायतीचे सरपंच संपत कांडेकर, अभियंता संदीप कांडेकर, रामदास लहरे, साहेबराव कांडेकर, रोहिदास वाघ, ग्रामविकास अधिकारी तडवी, ज्ञानेश्वर कांडेकर, राहुल कांडेकर, रोहिदास माळी, कीर्ती जायभाये, बाळासाहेब गिते, तुषार गिते, चेतन आव्हाड, संतोष गिते आकाश आव्हाड आदी उपस्थित होते.

# कोतूळमध्ये ६.११ लाखांचा गुटखा साठा जप्त

## उपविभागीय पोलीस अधिकारी पथकाची धडक कारवाई

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले- अकोले तालुक्यातील कोतुळ येथे बंदी घालण्यात आलेल्या गुटखा व सुगंधित तंबाखूची बेकायदा साठवणूक करणाऱ्यावर संगमनेर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी कुणाल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली धडक कारवाई करण्यात आली. या कारवाईत सुमारे ६ लाख ११ हजार २३० रुपयांचा प्रतिबंधित गुटखा, तंबाखू व वाहन असा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून शोएब शावीद काझी (रा. कोतुळ, ता. अकोले) याच्याविरुद्ध अकोले पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, उपविभागीय पोलीस अधिकारी कुणाल सोनवणे यांना गुप्त माहिती मिळाली होती की, कोतुळ येथील शोएब काझी याने आपल्या घराजवळ उभी असलेल्या स्विफ्ट कार (एमएच-०२-बीडी-७५९९) मध्ये विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात गुटखा व सुगंधित तंबाखूचा साठा करून ठेवला आहे. त्यानुसार पोहेकॉ. दत्तात्रय मेंगाळ, पोहेकॉ. बाप्पुसाहेब हांडे, पोहेका. अनिल कडलग, पोकॉ. राहुल सारबंदे व पोकॉ. सुनील ढाकणे यांच्या पथकाने पंचांसमक्ष छापा टाकला.




कारवाईदरम्यान वाहनातून विविध कंपन्यांचा प्रतिबंधित गुटखा व पानमसाला जप्त करण्यात आला. यात तुलसी रॉयल जाफरानी जर्दा, रजनीगंधा फ्लेवर्ड पान मसाला, विमल पान मसाला, व्ही-१ बिग टोबॅको तसेच प्रीमियम आरएमडी पान मसाला यांचा मोठ्या प्रमाणावर समावेश आहे. यासह वापरात असलेली स्विफ्ट कारही जप्त करण्यात आली. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत ६,११,२३० रुपये इतकी आहे. (पान ५)
















आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा

संपर्क

८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४

७६२०३८८२३०




# शेतकऱ्यांना तातडीने युरिया द्या; काँग्रेसचे कृषी विभागाला निवेदन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सध्या खरीप हंगाम सुरू झाला असून तालुक्यातील शेतकऱ्यांना युरिया खताची मोठ्या प्रमाणात आवश्यकता आहे. खरीप हंगामा बाजरी मका सोयाबीन हे पिके उभी करताना युरिया अत्यंत गरजेचे असून शासनाच्या ताब्यात असलेल्या युरियाचा बफर स्टॉक तातडीने शेतकऱ्यांना खुली करावा अशी आग्रही मागणी काँग्रेसच्या वतीने करण्यात आली असून याबाबतचे निवेदन देण्यात आले आहे.



उपविभागीय कृषी अधिकारी यांना संगमनेर तालुका काँग्रेसच्या वतीने निवेदन देण्यात आले यावेळी तालुकाध्यक्ष अजय फटांगरे, कारखान्याचे संचालक विजय राहणे, सचिन दिघे, सरपंच नवनाथ कातोरे, संदीप गुंजाळ ,अमोल गुंजाळ, शुभम गुंजाळ ,योगेश गव्हाणे, अरुण गुंजाळ ,सागर वामन, नामदेव शिंदे, सुनील लांडगे, बाबासाहेब आभाळे, सचिन गुंजाळ ,नानासाहेब ढगे, भाऊसाहेब बालवडे ,लक्ष्मण गुंजाळ, अनिल लांडगे, सुदर्शन गुंजाळ, संगम लांडगे, सचिन लांडगे आदींसह संगमनेर तालुक्यातील विविध शेतकरी उपस्थित होते.

या निवेदनात म्हटले आहे की, सध्या निर्माण झालेला युरियाचा तुटवडा हा कृत्रिम नसून अनेक खत विक्रेत्यांकडे विक्रीसाठी युरियाचा साठाच उपलब्ध नाही .त्यामुळे शेतकऱ्यांची मोठी गैरसोय होत आहे. तसेच तालुक्यात युरिया उपलब्ध असल्याची चुकीची माहिती शेतकऱ्यापर्यंत पोहोचवत असल्याने संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. यामुळे भविष्यात कृषी विभागाबाबत शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढण्याची शक्यता आहे.

सध्या सुरू असलेल्या खरीप हंगामात बाजरी, मका ,सोयाबीन हे पीक तालुक्यात मोठ्या प्रमाणात घेतले जात असून संगमनेर तालुक्यात असलेल्या शासनाच्या साठ्यातील युरियाचा बफर स्टॉप तातडीने शेतकऱ्यांसाठी खुला करावा. जेणेकरून खरीप हंगामामध्ये शेतकऱ्यांना वेळेत युरिया उपलब्ध होऊ त्यांच्या पिकांचे नुकसान होणार नाही. यावेळी तालुकाध्यक्ष अजय फटांगरे म्हणाले की, यापूर्वीही दरवर्षी युरिया खताची मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांची मागणी असायची अशावेळी लोकनेते बाळासाहेब थोरात ही शासनाच्या विविध विभागांना सूचना देऊन शेतकऱ्यांना वेळेत युरिया उपलब्ध करून द्यायचे. शासनाचा बफर स्टॉप शेतकऱ्यांसाठी खुला करून द्यायचे मात्र आता तसे होत नसून अपयश झाकण्यासाठी चुकीच्या बातम्या दिल्या जात आहेत. तर सचिन दिघे म्हणाले की, हा तालुका शेतकऱ्यांचा आणि कष्टकऱ्यांचा तालुका आहे त्यामुळे शासनाने या सर्व बाबींची दखल घेऊन तातडीने शासनाच्या ताब्यातील युरियाचा बफर स्टॉक शेतकऱ्यांसाठी खुला करावा अशी आग्रही मागणी आम्ही करत आहोत अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल असा इशाराही काँग्रेसच्या विविध पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.






# गुन्हेगारांशी संबंध, पोलिस कॉन्स्टेबल चौधरी निलंबित

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - सराईत गुन्हेगारांशी संबंध असल्याच्या कारणावरून पोलिस कॉन्स्टेबल शंकर चौधरी यांना निलंबित करण्यात आले. जिल्हा पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी मंगळवारी ही कारवाई केली. पोलिस कर्मचारी निलंबित होण्याची महिनाभरातील ही दुसरी घटना आहे.

पोलिस कॉन्स्टेबल चौधरी श्रीरामपूर अपर पोलिस अधीक्षक कार्यालयात कार्यरत होते. तेथून त्यांची बदली पोलिस मुख्यालयात झाली.

श्रीरामपूर येथे कार्यरत असताना त्यांचे सराईत गुन्हेगारांशी संबंध होते. यासंदर्भात पोलिस अधीक्षक कार्यालयाकडे अनेक तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. श्रीरामपूर तालुक्यात मोठ्याप्रमाणात



वाळू तस्करी चालते.

त्यातही त्यांचा सहभाग असल्याचे प्राथमिक चौकशीत आढळून आले. त्यामुळे चौधरी यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली असून, तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी सुरू करण्यात आली आहे. यापूर्वी पोलिस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ यांना निलंबित करण्यात आले. ते स्थानिक गुन्हे शाखेत कार्यरत होते. चौधरी हेही काही दिवस स्थानिक गुन्हे शाखेत नेमणूकीस होते.

# शिवसेनेच्या विविध पदांवर पदाधिकाऱ्यांची नियुक्ती



## अमर कतारी यांची तालुका प्रमुखपदी निवड

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार तसेच शिवसेना नेते खा. संजय राऊत, खा. अनिल देसाई, शिवसेना सचिव विनायक राऊत आणि संपर्कप्रमुख सुनील शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हाप्रमुख सचिन कोते, जगदीश चौधरी आणि विधानसभा संपर्कप्रमुख सूर्यकांत शिंदे यांच्या सूचनेनुसार शिर्डी लोकसभा मतदारसंघातील विविध पदांवर निष्ठावंत शिवसैनिकांची नव्याने नियुक्ती करण्यात आली आहे.

या नियुक्त्यांमध्ये संगमनेर तालुकाप्रमुखपदी निष्ठावंत शिवसैनिक अमर कतारी यांची नियुक्ती करण्यात आली असून, भीमाशंकर पावशे यांनाही पुन्हा तालुकाप्रमुखपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. ज्येष्ठ शिवसैनिक ड. दिलीप साळगट यांच्यावर सहसंपर्कप्रमुखपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

तसेच सदाशिव हासे व इम्तियाज शेख यांची उपजिल्हाप्रमुखपदी, रवींद्र कानकाटे यांची उपजिल्हा संघटकपदी, रेवनाथ शिंदे यांची उपजिल्हा समन्वयकपदी, योगेश खेमनर यांची विधानसभा प्रमुखपदी, बाळासाहेब घोडके यांची विधानसभा शहर प्रमुखपदी आणि सतीश भुजबळ यांची तालुका समन्वयकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर रवी गिरी यांची घुलेवाडी शहर प्रमुख पदी नेमणूक करण्यात आली.

संगमनेर तालुक्यातील शिर्डी विधानसभा मतदारसंघातील ३२ गावांच्या तालुकाप्रमुखपदी आश्वी येथील निष्ठावंत शिवसैनिक प्रकाश गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली असून, विधानसभा प्रमुखपदी ज्येष्ठ शिवसैनिक कैलास बिहानी (शिर्डी) यांना संधी देण्यात आली आहे.

याशिवाय, युवा शिवसैनिक निलेश (राजू) सातपुते यांची शिवसेना तालुका संघटकपदी नियुक्ती करण्यात आली. संगमनेर तालुक्यातील अकोले विधानसभा मतदारसंघातील २८ गावांच्या तालुकाप्रमुखपदी अमित फटांगरे यांची नियुक्ती करण्यात आली. जिल्हाप्रमुख सचिन कोते पाटील आणि जगदीश चौधरी पाटील यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. या नियुक्त्यांमुळे संगमनेर तालुका व शिर्डी लोकसभा मतदारसंघातील शिवसैनिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे संगमनेर शिवसेना तसेच शिर्डी लोकसभा मतदारसंघातील सर्व शिवसैनिकांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. यावेळी शिवसेना शहर प्रमुख अमित चव्हाण, शहर प्रमुख फैसल सय्यद, विधानसभा संघटक दीपकजी साळुंखे, शिर्डी लोकसभा दक्षिण उपजिल्हा संघटक रंगनाथ फटांगरे, शहर समन्वयक असिफ तांबोळी यांच्यासह अनेक शिवसैनिकांनी सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# संतांचे संगती... आत्मज्ञानाची प्रगती

## ज्ञान आणि वैराग्याची आदिमाया: 'संत मुक्ताबाई'

**अखंड ज्याचा नामाचा गजर।**
**तोचि एक योगीराज भूमीव।**

वारकरी संप्रदायात ज्ञानेश्वर माऊलींना आपण 'माऊली' म्हणतो. पण त्या माऊलीचीही माऊली ठरली ती संत मुक्ताबाई. वयाच्या १८ व्या वर्षी तिने जे ज्ञान, वैराग्य आणि सामर्थ्य दाखवले ते अद्वितीय आहे. निवृत्तीनाथ, ज्ञानदेव आणि सोपानदेव या तिन्ही ज्ञानसूर्यांना सावरणारी आणि दिशा देणारी आदिशक्ती म्हणजे मुक्ताई.



**जन्म आणि बालपणीचा संघर्ष**

मुक्ताबाईंचा जन्म इ.स. १२७९ च्या सुमारास आळंदी येथे झाला. विठ्ठलपंत आणि रुक्मिणीबाई यांची ही चौथी अपत्य. विठ्ठलपंतांनी संन्यास घेऊन पुन्हा गृहस्थाश्रम स्वीकारल्याने तत्कालीन समाजाने संपूर्ण कुटुंबाला बहिष्कृत केले. 'संन्याशाची पोरं' म्हणून या चारही भावंडांना अपमान सहन करावा लागला.

आई-वडिलांनी मुलांच्या शुद्धीसाठी प्रयाग येथे देहत्याग केला. ७-८ वर्षांची मुक्ताई अनाथ झाली. पण या लहान वयातच तिच्यात प्रगल्भ मातृसंवेदना आणि ब्रह्मज्ञान जागे झाले होते.

**ताटीचे अभंग**

एकदा ज्ञानेश्वर माऊलींना आळंदीत भिक्षा मिळाली नाही. अपमानाने दुखावून त्यांनी झोपडीची ताटी आतून लावून घेतली. तेव्हा ८-९ वर्षांच्या मुक्ताईने दाराबाहेरून जे अभंग म्हटले ते आज 'ताटीचे अभंग' म्हणून प्रसिद्ध आहेत.

**संत जेणें व्हावें । जग बोलणे साहावें ।।**
**थोरपण जेथे वसें । तेथे भूतदया असें ।।**
**रागें भरावे कवणाशी ।**
**आपण ब्रम्ह सर्वदेशी ।।**
**ऐशी समदृष्टी करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।**

हा केवळ सांत्वन नव्हता. हा समता, क्षमा आणि ब्रह्मभावाचा पहिला जाहीरनामा होता.

लीला आणि योगसामर्थ्य

**१. मांड्याचा चमत्कार:** एकदा निवृत्तीनाथांना मांडे खायचे होते. कर्मठ विसोबा खेचर यांनी मुक्ताईला खापर दिले नाही. ज्ञानेश्वरांनी स्वतःचा देह खापराप्रमाणे तापवला आणि त्यावर मुक्ताईने मांडे भाजले. हा चमत्कार पाहून विसोबांचा अहंकार गळला. पुढे हेच विसोबा खेचर संत नामदेवांचे गुरू झाले.

**२. चांगदेव उद्धार:** १४०० वर्षे तपश्चर्या करूनही गर्वाने भरलेल्या योगी चांगदेव वाघावर बसून आळंदीला आले. ज्ञानेश्वरांनी निर्जीव भिंतीला चालवले. त्यावेळी मुक्ताई हसून म्हणाली, चौदाशे वर्षे जगलास रे चांग्या, पण कोरा तो कोराच राहिलास! हे शब्द ऐकून चांगदेवांचे डोळे उघडले. त्यांनी मुक्ताईला गुरू मानले. मुक्ताबाई आणि चांगदेव यांच्यातील संवादालाच 'पासष्टीचा अर्थ' म्हणतात.

साहित्यिक ठेवा

मुक्ताईंचे अभंग प्रासादिक असून त्यात खोल वेदांत आहे. त्यांनी हरिपाठ रचले. त्यांचे 'कूट अभंग' विशेष गूढ आहेत. मुंगी उडाली आकाशी, तिने गिळिले सूर्यासी या ओळीत सूक्ष्म जीवाने ब्रह्माला कसे जाणले हे सांगितले आहे. त्या ज्ञानेश्वरांना 'ज्ञानोबा' आणि निवृत्तीनाथांना 'गुरू' मानत असत.

**महाप्रयाण**

ज्ञानेश्वर, सोपान आणि नामदेवांच्या समाधीनंतर निवृत्ती आणि मुक्ताई जळगावजवळील एदलाबाद म्हणजे आजचे मुक्ताईनगर येथे तापी तीरावर आले. शके १२१९ च्या वैशाख वद्य द्वादशीला अचानक वादळ, काळे ढग आणि विजेचा कडकडाट झाला. अवघ्या १८ वर्षांच्या मुक्ताई प्रकाशात विलीन झाल्या. त्यांचे भौतिक शरीर उरलेच नाही. निवृत्तीनाथांनी तिथेच तिचे समाधी स्थळ मानले.

आज कोथळी, तालुका मुक्ताईनगर येथे मुक्ताईचे मंदिर आहे. दरवर्षी लाखो वारकरी 'आदिमाया मुक्ताई माऊली'च्या दर्शनाला येतात.

**तात्पर्य**

संत मुक्ताबाईंचे जीवन हे केवळ स्त्रीशक्तीचे प्रतीक नाही. ते अहंकाराला आव्हान देणारे तेज आहे. समाजाने नाकारले, वयाने लहान होते, तरीही तिने चांगदेवांसारख्या सिद्ध योग्याला ज्ञान दिले. तिच्या अभंगातून आजही समता, करुणा आणि निर्भयता शिकायला मिळते.

मुक्ताईने दाखवून दिले की खरे मोठेपण वयात नाही, तर अंतःकरणातील ज्ञान आणि वैराग्यात आहे. ती वारकरी परंपरेची खरी आदिमाया आहे.



**संकलन, संतचरणरज...**

**श्री. सदाशिव रामनाथ मुळे**

(पुणे युवावार्ता, प्रतिनिधी), मो . ८६६८३२७१७४

सौजन्य - निजध्यास...

# जायकवाडी प्रकल्पातील पुनर्वसित गावांचे तातडीने सर्व्हेक्षण करा - ना. विखे

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - जायकवाडी प्रकल्पातील पुनर्वसित गावांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी महसूल आणि जलसंपदा विभागाने एकत्रित सर्व्हेक्षण करून एक महीन्यात प्रस्ताव सादर करण्याचा सूचना जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या.



जायकवाडी प्रकल्पात पुर्नवसित झालेल्या शेवगाव नेवासा आणि गंगापूर तालुक्यातील गावांच्या समस्याबद्दल मंत्रालयात मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली.बैठकीला मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील,आ.मोनिका राजळे आ.रमेश बोरनारे आ.विठ्ठलराव लंघे आ.अक्षय कर्डीले जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले जिल्हाधिकारी डॉ पंकज आशिया यांच्यासह जलसंपदा आणि मदत व पुनर्वसन विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत पुर्नवसित गावात बुडीत क्षेत्र किती आहे.असलेल्या किती जमीनीमध्ये पाणी जाते याबाबतचा ड्रोण सर्व्हे करून घेण्याचे सूचित करून,जलसंपदा व महसूल विभागाने गावांमध्ये जनसुनावणी घेवून ज्यांच्या जमीनी आहेत त्या शेतकऱ्यांची माहीती महीना भरात संकलित करून त्याचा प्रस्ताव शासनाने पाठवावा. जमीन अदलाबदल, भोगावटा वर्ग एक करणे,तसेच पुर्नवसित गावात नसलेल्या सुविधांचा आढावा जिल्हाधिकारी यांनी घ्यावा यासंदर्भात स्वतंत्र बैठक घेण्याचे निश्चित करण्यात आले.मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी जमीनीचा सर्व्हे आल्यानंतर त्या गावातील प्रश्नाच्या संदर्भात निर्णय करण्याची ग्वाही दिली. शेतकऱ्यांच्या समस्या मांडतांना आ.मोनिका राजळे यांनी जायकवाडी प्रकल्प आधी झाला.त्यानंतर झालेल्या कायद्यामुळे शेतकऱ्यांची मोठी समस्या निर्माण झाल्याचे सांगितले.आ.विठ्ठलराव लंघे यांनी पुर्नवसित गावांच्या समस्या मोठ्या प्रमाणात आहेत.या गावांना न्याय मिळेल असे निर्णय व्हावेत आशी अपेक्षा व्यक्त केली.

# पान १ वरून - नगरपरिषदेचा अतिक्रमणांवर बुलडोझर...

दल अथवा रुग्णवाहिकेला वेळेत घटनास्थळी पोहोचणे कठीण होत असल्याची गंभीर बाबही अनेक नागरिकांनी नगरपरिषदेच्या निदर्शनास आणून दिली होती.

या तक्रारींची दखल घेत नगरपरिषद प्रशासनाने आज नियोजनबद्ध पद्धतीने अतिक्रमण हटविण्याची मोहीम राबवली. जेसीबी व मनुष्यबळाच्या सहाय्याने रस्त्यावरील अडथळे हटविण्यात आले. कारवाईदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. या कारवाईमुळे रस्ता मोकळा झाल्याने वाहनचालकांसह नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, अशा प्रकारची मोहीम सातत्याने राबवून पुन्हा अतिक्रमणे होऊ नयेत, अशी मागणीही नागरिकांनी केली आहे. नगरपरिषदेनेही शहरातील सार्वजनिक रस्ते, फूटपाथ आणि प्रमुख चौक अतिक्रमणमुक्त ठेवण्यासाठी पुढेही नियमित कारवाई सुरू राहणार असल्याचे संकेत दिले आहेत.

# संपादकीय...

## १६ जुलै जागतिक सर्प दिन

## सापांविषयीची भीती नव्हे, तर माहिती आवश्यक

दरवर्षी १६ जुलै रोजी जगभरात जागतिक सर्प दिन साजरा केला जातो. सापांविषयी जनजागृती निर्माण करणे, त्यांच्याबद्दलचे गैरसमज आणि अंधश्रद्धा दूर करणे तसेच पर्यावरणातील त्यांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेची जाणीव समाजाला करून देणे हा या दिवसामागील प्रमुख उद्देश आहे. साप हा असा प्राणी आहे ज्याच्याबद्दल भीती, गैरसमज आणि दंतकथा सर्वाधिक प्रमाणात आढळतात. मात्र, प्रत्यक्षात साप हे निसर्गाच्या अन्नसाखळीतील अत्यंत महत्त्वाचे घटक असून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी त्यांचे अस्तित्व आवश्यक आहे. जगभरात सापांच्या सुमारे ३४०० हून अधिक प्रजाती आढळतात. उत्तर कॅनडाच्या बर्फाच्छादित प्रदेशांपासून ते मेझॉनच्या दाट जंगलांपर्यंत, वाळवंटांपासून ते समुद्रकिनाऱ्यांपर्यंत सापांचे अस्तित्व दिसून येते. भारतातही सापांच्या अनेक प्रजाती आढळतात. नाग, मण्यार, घोणस, फुरसे, धामण, दिवड, नानेटी, कवड्या, तस्कर आणि गवत्या यांसारख्या सर्पप्रजाती आपल्या परिसरात आढळतात. यापैकी केवळ नाग, मण्यार, घोणस आणि फुरसे या चार प्रजाती विषारी आहेत, तर इतर बहुतांश साप बिनविषारी असून मानवासाठी निरुपद्रवी असतात. भारतीय संस्कृतीमध्ये सापांना विशेष स्थान आहे. अनेक ठिकाणी सर्पपूजनाची परंपरा आहे आणि नागपंचमी हा सण सर्पांना समर्पित आहे. मात्र, पूजेसोबतच सापांविषयी भीती आणि अंधश्रद्धाही मोठ्या प्रमाणावर पसरलेल्या आहेत. साप डूख धरतो, तो बदला घेतो, तो माणसाचा पाठलाग करतो अशा समजुती समाजात प्रचलित आहेत. प्रत्यक्षात या सर्व गोष्टींना कोणताही वैज्ञानिक आधार नाही. साप हा स्वभावाने भित्रा प्राणी असून तो माणसांपासून दूर राहण्याचा प्रयत्न करतो. स्वतःच्या बचावासाठी किंवा धोका जाणवल्यासच तो दंश करतो. सापांचे पर्यावरणातील योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. विशेषतः शेतीप्रधान देश असलेल्या भारतात साप हे शेतकऱ्यांचे खरे मित्र मानले जातात. सापांचे मुख्य अन्न म्हणजे उंदीर आणि इतर लहान किटक. उंदीर हे शेतातील उभ्या पिकांचे तसेच साठवलेल्या धान्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान करतात. शासकीय आकडेवारीनुसार दरवर्षी उंदीर आणि घुशींमुळे अन्नधान्य उत्पादनाचे मोठे नुकसान होते. उंदरांची वाढ झपाट्याने होत असल्यामुळे त्यांची संख्या नियंत्रणात ठेवण्यासाठी निसर्गाने सापांची निर्मिती केली आहे. धामणसारखा बिनविषारी साप एका आठवड्यात अनेक उंदीर खातो. एका वर्षात तो शेकडो उंदरांचा फडशा पाडतो. त्यामुळे शेतातील पिकांचे आणि गोदामांतील धान्याचे संरक्षण करण्यामध्ये सापांची मोठी भूमिका असते. जर सापांची संख्या कमी झाली तर उंदरांची संख्या झपाट्याने वाढेल आणि त्याचा थेट परिणाम शेती उत्पादनावर होईल. अन्नधान्याची नासाडी वाढेल आणि शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होईल. याशिवाय उंदरांमुळे लेप्टोस्पायरोसिससारख्या अनेक जिवघेण्या रोगांचा प्रसार होण्याची शक्यता असते. त्यामुळे सापांचे संरक्षण म्हणजे शेती, पर्यावरण आणि मानवी आरोग्याचे संरक्षण होय. पावसाळ्याच्या दिवसांत साप घरांच्या परिसरात, गोठ्यात, शेतात, सरपणाच्या ढिगाऱ्यात किंवा अडगळीच्या ठिकाणी आढळण्याचे प्रमाण वाढते. यामागे त्यांच्या प्रजननाचा कालावधी आणि बिळांमध्ये पाणी साचल्यामुळे नवीन आश्रयस्थानाच्या शोधात बाहेर पडणे ही प्रमुख कारणे असतात. अशावेळी नागरिकांनी घाबरून न जाता संयम बाळगणे आवश्यक आहे. साप दिसल्यास त्याला डिवचू नये, दगड किंवा काठी मारू नये तसेच स्वतः पकडण्याचा प्रयत्न करू नये. सुरक्षित अंतर ठेवून जवळच्या सर्पमित्रांना किंवा वन विभागाला माहिती द्यावी. साप घरामध्ये येऊ नयेत यासाठी काही सोप्या उपाययोजना करता येतात. घराच्या आसपास स्वच्छता राखावी, अडगळीचे साहित्य साठवून ठेवू नये, सरपण आणि गवत उंच ठिकाणी ठेवावे, भिंतीतील तडे बुजवावेत तसेच परिसरात पाणी साचू देऊ नये. रात्री बाहेर पडताना टॉर्चचा वापर करावा आणि शेतात काम करताना योग्य पादत्राणे वापरणे आवश्यक आहे. सर्पदंश झाल्यास घाबरून न जाता त्वरित वैद्यकीय उपचार घेणे अत्यंत गरजेचे आहे. जखम स्वच्छ पाण्याने धुवावी आणि रुग्णाला शक्य तितक्या लवकर जवळच्या रुग्णालयात दाखल करावे. विष तोंडाने शोषून घेणे, जखमेवर काप करणे, मांत्रिकांकडे नेणे किंवा विविध घरगुती उपाय करणे हे धोकादायक ठरू शकते. सर्पदंशावरील वैज्ञानिक आणि वैद्यकीय उपचारांवरच विश्वास ठेवणे आवश्यक आहे. भारतात वन्यजीव संरक्षण कायद्यानुसार साप मारणे, पकडणे, बाळगणे, त्यांचा व्यापार करणे किंवा प्रदर्शन करणे हा दंडनीय गुन्हा आहे. त्यामुळे साप आढळल्यास त्याला मारण्याऐवजी त्याच्या संरक्षणासाठी पुढाकार घेणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. साप हे भीतीचे नव्हे तर पर्यावरण संतुलनाचे प्रतीक आहेत. जैवविविधतेचे रक्षण, उंदरांवर नियंत्रण आणि शेतीचे संरक्षण यामध्ये त्यांचे योगदान अमूल्य आहे. त्यामुळे सापांविषयीचे गैरसमज, अंधश्रद्धा आणि भीती दूर करून त्यांच्या संवर्धनासाठी समाजाने पुढाकार घेणे आवश्यक आहे. जागतिक सर्प दिनानिमित्त सापांना वाचविण्याचा, त्यांचे संरक्षण करण्याचा आणि निसर्ग संवर्धनात आपला सक्रिय सहभाग नोंदविण्याचा संकल्प करूया. कारण साप वाचले तरच पर्यावरणाचा समतोल टिकून राहील आणि शेतीसह संपूर्ण जैवसाखळी अधिक सुरक्षित राहील.

# नंदकिशोर राहाणे यांना "शिवराष्ट्र भूषण" पुरस्कार प्रदान



युवावार्ता (प्रतिनिधी):- संगमनेर - आचार्य ट्रेकर्सचे संस्थापक आणि शिवराष्ट्र हायकर्स, महाराष्ट्राच्या जलदुर्ग आणि गिरीदुर्गांच्या अभ्यासासाठी सदैव तत्पर असणारे नंदकिशोर राहाणे यांना शिवराष्ट्र हायकर्सचा राज्यस्तरीय मानाचा शिवराष्ट्र भूषण पुरस्कार नुकताच पावनखिंडीमध्ये रायाजी बांदल यांचे तेरावे वंशज आणि मराठी चित्रपट सृष्टीतील आघाडीचे अभिनेते अनिकेत राजे बांदल, यांचे शुभहस्ते आणि शिवराष्ट्र हायकर्सचे अध्यक्ष प्रशांत साळुंखे, शिवव्याख्याते प्रा. दीपक कर्पे, जहाँबाज ट्रेकर्सचे विजयसिंह सोळंके तथा बाप्पाजी, संतोष शेळके आणि पन्हाळा ते पावनखिंड मोहिमवीरांच्या उपस्थितीमध्ये सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

नरवीर बाजीप्रभू देशपांडे यांच्या स्मृतिदिनी पावनखिंडीमध्ये आयोजित या कार्यक्रमासाठी सुभेदार नवनाथ पवार, शिविअ. संभाजी झावरे, केंद्रप्रमुख पं. के. घुले, बी. आर. नागरे, गोरक्षनाथ हासे, के. के. आहेर, मुख्याध्यापक सयाजी राहाणे, युवाव्याख्याते भूपाल शेळके, सुखदेव इल्हे, बीडचे कृष्णा तौर, प्राचार्य बाळासाहेब आहेर, कैलास कानवडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

शिवरायकर्स महाराष्ट्राच्या वतीने गेल्या ३४ वर्षापासून छत्रपती शिवाजी महाराज ज्या मार्गाने विशाळगडावर गेले त्या मार्गावर नरवीर शिवा काशीद आणि सुभेदार बाजीप्रभू देशपांडे यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून दरवर्षी पदभ्रमंती मोहीम आयोजित केली जाते. यापूर्वी या मोहिमेत खा. राजू शेट्टी, खा. श्रीकांतदादा शिंदे, आ. सुजितजी मिणचेकर, खा. धैर्यशीलदादा माने, खा. युवराज छत्रपती संभाजी राजे, आ. ऋतुराज पाटील, मुख्यमंत्री वैद्यकीय पक्षाची मंगेश चिवटे, मंत्रालयातील विविध वरिष्ठ अधिकारी यांनी सहभाग नोंदवलेला आहे.

राहाणे हे गेल्या आठ वर्षापासून सातत्याने या मोहिमेमध्ये सहभागी होत आहेत. यापूर्वी त्यांनी रायगड ते सिंधुदुर्ग दरम्यान सर्व जलदुर्गांची मोहीम पूर्ण केलेली आहे.यामध्ये कुलाबा, उंदेरी, खांदेरी, पद्मदुर्ग, जंजिरा, कोरलाई, बाणकोट, सर्जेकोट सुवर्णदुर्ग, गोवा फोर्ट,पूर्णगड, यशवंतगड, जयगड, रत्नदुर्ग, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग आदि सागरी किल्ल्यांची मोहीम पूर्ण केलेली आहे. त्याचबरोबर किल्ले वासोटा मोहिम शिवराष्ट्र बरोबर पूर्ण केलेली आहे.

# मालपाणी विद्यालयात महाकवी कालिदास दिन उत्साहात साजरा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - येथील मालपाणी विद्यालयात महाकवी कालिदास यांची जयंती 'कालिदास दिन' म्हणून उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक उत्तम एरंडे तर प्रमुख पाहुणे म्हणून पालक प्रतिनिधी सौरभ म्हाळस ( सचिव, रोटरी क्लब संगमनेर) उपस्थित होते. महाकवी कालिदास यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविकात विनायक हिरे यांनी कालिदास दिनाचे महत्त्व विशद करताना, संस्कृत साहित्यातील महान कवी, कविकुलगुरू महाकवी कालिदास यांच्या साहित्याने भारतीय संस्कृती, निसर्गप्रेम आणि मानवी भावविश्वाला अजरामर केले आहे. त्यांच्या साहित्याचा गौरव करणे आणि त्यांचे विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे, हा कालिदास दिन साजरा करण्यामागील मुख्य उद्देश आहे, असे सांगितले.

यानंतर ईश्वरी विठ्ठल क्षीरसागर आणि रुद्र पुरुषोत्तम जोशी या विद्यार्थ्यांनी महाकवी कालिदास यांच्या जीवनकार्यावर प्रभावी भाषणे करून उपस्थितांची मने जिंकली.

प्रमुख पाहुणे सौरभ म्हाळस यांनी आपल्या मनोगतात 'आषाढस्य प्रथम दिवसे' हे शब्द उच्चारले की महाकवी कालिदासांचे 'मेघदूत' आणि निसर्गसौंदर्य डोळ्यांसमोर उभे राहते. कालिदासांनी निसर्ग, भावना आणि संस्कृती यांचा अद्वितीय संगम घडविला असून त्यांच्या साहित्याचा अभ्यास विद्यार्थ्यांमध्ये भाषेची समृद्धी, कल्पकता आणि संवेदनशीलता विकसित करणारा आहे, असे प्रतिपादन केले. तसेच कालिदासांच्या साहित्याचा आदर्श विद्यार्थ्यांनी आत्मसात करावा, असे आवाहनही त्यांनी केले तसेच कालिदास यांची प्रतिमा विद्यालयास भेट दिली .

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन विनायक हिरे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय व सत्कार गीतांजली गवंडी यांनी केला, तर शीतल मुर्तडक यांनी आभार मानले. कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


**पाहिजेत**

घरकामासाठी होतकरू महिला कामगार पाहिजे

वेळ ३ ते ७ मालदाड रोड

डॉ. शेवाळे हॉस्पिटल, विद्यानगर, संगमनेर

9822304638



ॲड. बी. जी. कोल्हे
निशाणी - ०७.


### जाहिर नोटीस

**संगमनेर येथील मे. जिल्हा न्यायाधिश-२, संगमनेर, ता. संगमनेर, जिल्हा अहमदनगर**
**दिवाणी किरकोळ अर्ज नं. ५६/२०२६.**

पाराबाई विष्णु धांडे व इतर ३ - अर्जदार
विरुध्द
कोणीही नाही. - सा. वाला.

ज्याअर्थी आंबेवंगण, ता. अकोले येथील राहणारे अर्जदार नं. १ व २ हे अर्जदार नं. ३ व ४ यांचे आजी-आजोबा आहेत. यशोदा ही अर्जदार नं. १ व २ यांची सुन दि. ०६/०६/२०१७ रोजी मयत झाली आहे व त्यांचा मुलगा एकनाथ हा दि. २०/०९/२०२४ रोजी अहिल्यादेवी चौक, राजगुरुनगर, खेड, जि. पुणे येथे रहाते घरी मयत झालेला आहे.

एकनाथ हा ब्रम्हो ब्रेक इंडिया प्रा. लि. गट नं. ३०७ (ओपीसी) नाणेकरवाडी, चाकण, ता. खेड, जि. पुणे येथे कॉन्ट्रक्ट लेबर म्हणुन कामास होता. एकनाथ हा नोकरीस असताना त्याने भारतीय आयुर्विमा महामंडळ यांचेकडे विमा पॉलिसी क. ९१५७१३१९७ ही काढलेली होती. सदर पॉलीसीला अर्जदार नं. ३ हा नॉमिनी होता. त्यामुळे मयत एकनाथ व यशोदा यांना अर्जदार नं. ३ व ४ हे मुले वारस असुन ते अद्याप अज्ञान आहेत. त्यामुळे त्यांचे अ.पा.क. जनक आजी आजोबा म्हणुन अर्जदार नं. १ व २ हे कायदेशीर पालक म्हणुन आहेत. मयत एकनाथ विष्णु धांडे यांची भारतीय आयुर्विमा महामंडळ यांचेकडील विमा पॉलिसी क. ९१५७१३१९७ मध्ये असलेली रक्कम रु. २,००,०००/- मिळणेकरीता अर्जदार नं. १ हिने संबंधित कार्यालयाकडे मयत एकनाथ धांडे यांचे वारसदार म्हणुन दि. ०७/०५/२०२६ रोजी अर्जदार नं. १ हिने अर्ज केला असता सदर विमा कंपनीने अर्जदारांचे नावाने न्यायालयाचे पालकत्व प्रमाणपत्राची मागणी केली असल्यामुळे अर्जदार यांनी संगमनेर, जि. अहमदनगर येथील मे. जिल्हा न्यायाधिश-२, संगमनेर या न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज पालकत्व प्रमाणपत्र मिळावे म्हणुन दाखल केलेला आहे.

ज्याअर्थी तमाम लोकांना विशेषतः कळविण्यात येते की, अर्जदार नं. १ पाराबाई विष्णु धांडे हिची पालकत्व म्हणुन नेमणुक करण्यात यावी याबाबत कोणाची काही हरकत असल्याच सदरहू नोटीस प्रसिद्ध झालेपासुन एक महिन्याच्या आत किंवा १४/०८/२०२६ रोजी नेमलेल्या तारखेस स्वतः अगर अधिकृत प्रतिनिधी मार्फत या न्यायालयात हजर राहुन आपणे म्हणणे मांडावे. अन्यथा अर्जदाराचा पुरावा लक्षात घेऊन त्याचा हक्क शाबीत झाल्यास अर्जदार नं. ३ व ४ यांचे अर्जदार नं. १ ही पालकत्व म्हणुन असेल.

आज दि. १३/०७/२०२६ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली अस

हुकूमावरुन,

तयार करणार
**(एस. के. गाडेकर)**
व. लिपीक,

**(एस. व्ही. शिवरात्री)**
अधिक्षक
जिल्हा न्यायालय, संगमनेर.

# सर्व बातम्या तथ्यहीन ...

पान १ वरून -

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'वर्षा' या निवासस्थानी घेतलेल्या भेटीनंतर राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चांना उधाण आले होते, त्या पार्श्वभूमीवर पाटील यांनी माध्यमांशी संवाद साधत सर्व अफवांना पूर्णविराम दिला.

जयंत पाटील यांना महायुती सरकारमध्ये अर्थमंत्रीपद दिले जाणार असल्याच्या वावड्यांवर त्यांनी आक्षेप घेतला. ते म्हणाले, खातेवाटपाचा अधिकार मुख्यमंत्र्यांचा असतो, तो अधिकारही तुम्ही हिरावून घेत आहात. मी कसलाच विचार केलेला नाही, तुम्ही लोकांनीच फार विचार केला आहे. माणूस पक्षातून गेला तरच अशा चर्चांना अर्थ असतो ना? आम्ही सर्व शरद पवारांसोबत आहोत. अशा खोट्या चर्चा ऐकून वाईट वाटते.


**पाहिजेत**

नामांकित व्हॅल्युएशन फर्ममध्ये पुरूष पाहिजेत

पुरुष- 02 जागा

इच्छुक आणि पात्र उमेदवारांनी खालील क्रमांकावर संपर्क साधावा

9860565356



**पाहिजेत**

राजवीर फार्मा
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त गरजुंनी संपर्क साधावा

मार्केटिंग - १ जागा
दुकानकामासाठी - ०२

रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस

ठिकाण- जाणता राजा रोड, मुथुट फासनान्स पाठीमागे, २ नं गल्ली, संगमनेर

8669184141



**फ्लॅट विकणे आहे**

2 BHK फ्लॅट विकणे आहे
नवीन बांधकाम, स्वतंत्र पार्किंगसह

ठिकाण: वृंदावन हाईट्स, चंद्रशेखर चौक, संगमनेर

- संपर्क -
8788945208
8208223721



**पाहिजेत**

पेट्रोल पंप वर 2 कर्मचाऱ्यांची पदभरती करायची असून, इच्छुक असणाऱ्या उमेदवारांनी कृपया संपर्क करावा.

चैतन्य पेट्रोलियम
संगमनेर बायपास पुणे - नाशिक हायवे, घुलेवाडी, ता. संगमनेर

- संपर्क -
8888808397



**पाहिजेत**

मॉम-एबल फर्टिलिटी अँड आयव्हीएफ सेंटर, संगमनेर

आरएमओ (महिला) - १
शैक्षणिक पात्रता : BAMS / BHMS
नर्सिंग स्टाफ (रात्रपाळी) - १
हाऊसकीपिंग मावशी - २
घर कामासाठी मावशी - १
(सकाळी ९ ते सायंकाळी ५)

— संपर्क —
9860477807


### तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
क्र. कावी/ जन्म नोंद/५६६/२०२६ दिनांक - २४/०६/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार **श्री. रमेश संपत लांडगे, रा. वडगांवलांडगा, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** यांनी दिनांक ०४/०६/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे **रा. वडगांवलांडगा, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथील रहिवासी असून अर्जदार यांचा/यांची आजोबा स्वत: नामे रमेश संपत लांगडे यांचा **जन्म मौजे वडगावलांडगा, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथे **दिनांक ०९/०३/१९८२** रोजी झाला असून त्यांचा/त्यांची **जन्म** नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी, वडगावलांडगा यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे. तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी, वडगावलांडगा यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**

### तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
क्र. कावी/ जन्म नोंद/५६६/२०२६ दिनांक - २४/०६/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार **श्री.निलेश प्रभाकर रहाणे, रा. चंदनापुरी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** यांनी दिनांक ०९/०६/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे **रा. चंदनापुरी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथील रहिवासी असून अर्जदार यांचा/यांची वडील नामे प्रभाकर गेणु रहाणे यांचा **जन्म मौजे चंदनापुरी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथे **दिनांक ०२/०६/१९५९** रोजी झाला असून त्यांचा/त्यांची **जन्म** नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी, चंदनापुरी यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे. तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी, चंदनापुरी यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**


**पाहिजेत**

सोनोग्राफी सेंटरसाठी मुलगी पाहिजे
कॉम्प्युटर व इंग्रजी टायपिंग येणे आवश्यक
(२ जागा त्वरीत भरणे आहे)
कामाची वेळ दु. १२ ते ८

संपर्क- जाधव सोनोग्राफी सेंटर
मर्चंट बँकेसमोर, नविन नगर रोड, संगमनेर

9307188862



**पाहिजेत**

जानकीराम गंगाधर काजळे ज्वेलर्ससाठी

सेल्स एक्झीक्युटिव्ह -४
मार्केटिंग एक्झीक्युटिव्ह -४
हेल्पर - २

मेन रोड, संगमनेर

7588249849









**पाहिजेत**

हिशोब करण्याकरिता दोन मुले पाहिजे
(कॉम्प्युटर येणे आवश्यक)

ए. जी. एस. टोमॅटो सप्लायर्स
टोमॅटो मार्केट यार्ड, संगमनेर
दुकान क्रमांक : १२३४५

7741816770
9763531663



**पाहिजेत**

आत्मशांती टी सेंटर (सपट चहा)साठी जागा भरणे आहे.

हेल्पर - ०२
ड्रायव्हर - ०१
सेल्समन - ०१

संपर्क- नेहरु चौक, संगमनेर

9922113534
9730468090



**पाहिजेत**

ड्रायव्हर - २ (एल.एम.व्ही.)
क्लर्क - २ (पदवीधर )
अकाउंटट - २ (टॅली)
कॉम्प्युटर ऑपरेटर -२
पदवीधर

डॉ. इथापे हॉस्पिटल, संगमनेर

9822791484
9518556933
9370017177



**ड्रायव्हार पाहिजे**

ऑटोमॅटिक गाडीसाठी
०१ जागा

मॅन्युअरल गेअर गाडीसाठी
०१ जागा

निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे

- संपर्क -
9117175050

# गाव तेथे शाखा, घर तेथे शिवसैनिक

## शिवसेना अधिक बळकट करणार - आ. अमोल खताळ



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यात शिवसेना आणि युवासेनेचे संघटन अधिक मजबूत करण्यासाठी 'गाव तेथे शाखा, घर तेथे शिवसैनिक' हा उपक्रम राबविण्यात येणार असल्याची घोषणा आमदार अमोल खताळ यांनी केली. प्रत्येक गावात शिवसेना शाखा स्थापन करून नागरिकांचे स्थानिक प्रश्न तत्काळ सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल, असे त्यांनी सांगितले.

तालुक्यातील कोकणगाव येथे आयोजित कार्यक्रमात असंख्य कार्यकर्त्यांनी आमदार खताळ यांच्या उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. यावेळी शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष रमेश शिंगोटे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी पक्षात प्रवेश केला. कार्यक्रमाला युवा सेनेचे उपजिल्हाप्रमुख सौरभ देशमुख, तालुकाप्रमुख सुशील शेवाळे, शहरप्रमुख सार्थक शेवाळे, श्रीनाथ थोरात तसेच शिवसेना व महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते.

आ. खताळ म्हणाले, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकारच्या लोककल्याणकारी योजना प्रभावीपणे राबविल्या जात असून कोकणगावात आगामी काळातही मोठ्या प्रमाणावर विकासकामे करण्यात येणार आहेत. विकासासाठी निधीची कमतरता भासणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

महायुती सरकारच्या काळात जळालेले वीज रोहित्र नागरिकांकडून कोणतीही वर्गणी न घेता तातडीने बदलले जात असल्याचे सांगत त्यांनी वीज, पाणी, आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रात सरकारने विशेष भर दिल्याचे नमूद केले. तसेच तालुक्यातील सुमारे २८ हजार बांधकाम कामगारांना विविध योजनांचा लाभ मिळवून दिल्याची माहितीही त्यांनी दिली. मेंढवन येथील १३२ केव्ही वीज उपकेंद्रासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असून ते कार्यान्वित झाल्यानंतर परिसरातील वीजपुरवठ्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटेल, असेही त्यांनी सांगितले.

### विद्यार्थ्यांच्या अडचणीची तातडीने दखल

**कोकणगावातील विद्यार्थ्यांसाठी एसटी बस गावात थांबत नसल्याची समस्या ग्रामस्थांनी आ. अमोल खताळ यांच्या निदर्शनास आणून दिली. याची तातडीने दखल घेत विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी कोकणगाव येथे एसटी बस नियमित थांबविण्याबाबत संगमनेर आगार व्यवस्थापकांना आवश्यक सूचना देण्यात येतील, असे आ. खताळ यांनी सांगितले.**

# संगमनेरमध्ये 'MOM-able'चा अनोखा उपक्रम

## वंध्यत्वाविषयी खुलेपणाने संवाद साधण्याचे आवाहन

MOM-able™



युवावार्ता (प्रतिनिधी):

संगमनेर - बाळ होण्यात अडचणी येत आहेत? चला, बोलूया! या संदेशासह चजच-रलश्रश या उपक्रमांतर्गत संगमनेरमध्ये वंध्यत्वाबाबत जनजागृती आणि तज्ज्ञ मार्गदर्शनासाठी विशेष अभियान राबविण्यात येत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून दांपत्यांना त्यांच्या समस्या मोकळेपणाने मांडण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या उपक्रमाचे मार्गदर्शन डॉ. एकता जगदीश वाबळे (एमबीबीएस, डीजीओ, FOGSI फेलोशिप इन इन्फर्टिलिटी) या अनुभवी वंध्यत्व तज्ज्ञ करणार आहेत. वंध्यत्वासंदर्भातील गैरसमज दूर करणे, आधुनिक IVF तंत्रज्ञानाची माहिती देणे तसेच प्रत्येक दांपत्याला वैयक्तिक समुपदेशन व उपचाराचे मार्गदर्शन करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

उपक्रमांतर्गत सहभागी होणाऱ्या दांपत्यांना तज्ज्ञांसोबत एक-एक करून संवाद साधण्याची संधी, IVF मधील नवीन तंत्रज्ञानाची माहिती आणि वैयक्तिक काळजी व मार्गदर्शन मिळणार आहे.

विशेष म्हणजे पावसाळी हंगामानिमित्त पहिली भेट (First Consultation) पूर्णपणे मोफत ठेवण्यात आली आहे. हा उपक्रम जुलै ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत प्रत्येक गुरुवारी सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत आयोजित करण्यात आला आहे.

ही सेवा Mom-able IVF Center, सेकंड फ्लोअर, संजीवन हॉस्पिटल, संगमनेर येथे उपलब्ध असून, जागा मर्यादित असल्याने इच्छुकांनी आगाऊ नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

संपर्क : ८०८० २१५ २१५ / ९६९९ ३२७ ३०१.


नोकरीची सुवर्णसंधी

'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'

(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे

पदे: Field Sales Executive
Business Development Manager

कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग

पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक

सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा

संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165


# बंद घरे फोडली

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -संगमनेर तालुक्यातील नाशिक पुणे महामार्गावरील जावळे वस्ती येथे मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी दोन बंद घरे फोडून चोरी करण्याचा प्रयत्न केला मात्र या धाडसी त्वरित चोरांच्या हाताला काही लागले नाही.

वसंत उत्तमगिर गोसावी रा. जावळे वस्ती, चंदनापूरी व त्यांच्या जवळच राहणारे बाजीराव सावळेराम कढणे हे परिवारासह बाहेर गावी होते. त्यामुळे यांची घरे बंद होती . त्याचा फायदा घेऊन चोरट्यांनी या दोन्ही घरांचे गेटचे व दरवाजाचे कुलूप तोडून घरात शिरून त्यांनी घरातील कपाटातील, पेट्यांमधील सामानाची उचकापाचा केली . किमती सामान शोधण्याचा प्रयत्न केला मात्र दोन्ही घरात त्यांना काही सापडले नाही. याप्रकरणी तालुका पोलीस ठाण्यात माहिती देण्यात आली. दरम्यान या धाडसी चोरीने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# कोतूळमध्ये ६.११ ...


पान १ वरून -

याप्रकरणी अकोले पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४८५/२०२६ दाखल करण्यात आला असून भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम १२३, २२३, २७४, २७५ तसेच अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ मधील विविध कलमांन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीसह जप्त मुद्देमाल व वाहन पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

राज्यात एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली भेसळ व गुटखा तस्करीविरोधात कठोर मोहीम सुरू असतानाही काही ठिकाणी छुप्या मार्गाने प्रतिबंधित गुटख्याची तस्करी सुरू असल्याचे समोर येत आहे. या पार्श्वभूमीवर संगमनेर विभागाच्या पोलिसांनी केलेली ही कारवाई गुटखा तस्करांसाठी मोठा इशारा मानली जात आहे. पुढील तपास अकोले पोलीस करीत आहेत.

# कष्ट, शिस्त आणि शेतकरी सेवेचा प्रेरणादायी प्रवास : हिरालाल सुर्वे

## वाढदिवसानिमित्ताने शुभेच्छा...



एखाद्या व्यक्तीचे आयुष्य त्याने मिळवलेल्या पदामुळे नव्हे, तर समाजासाठी केलेल्या निःस्वार्थ सेवेमुळे महान ठरते. अशीच प्रेरणादायी वाटचाल म्हणजे माजी मंडळ कृषी अधिकारी हिरालाल शांताराम सुर्वे यांचा जीवनप्रवास. १५ जुलै १९६३ रोजी जन्मलेल्या सुर्वे साहेबांनी आपल्या आयुष्याची ६३ वर्षे पूर्ण करून ६४ व्या वर्षात पदार्पण केले आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या कार्याचा गौरव करणे म्हणजे समाजसेवा, प्रामाणिकपणा आणि शेतकरीहिताच्या मूल्यांना सलाम करण्यासारखे आहे.

अत्यंत साध्या व प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत त्यांनी जावळे कडलग येथील मराठी शाळेत प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर कृषी क्षेत्रात कार्य करण्याचा ध्यास घेत त्यांनी १९८२ मध्ये श्रीगोंदा परिसरात फलोत्पादन सहाय्यक म्हणून सेवेला सुरुवात केली. पुढे संगमनेर आणि अकोले तालुक्यात तीन दशकांहून अधिक काळ विविध जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळत त्यांनी हजारो शेतकऱ्यांना आधुनिक शेती, फळबाग, जलसंधारण, पीक व्यवस्थापन आणि शासनाच्या विविध योजनांची माहिती देऊन सक्षम केले.

श्री. सुर्वे यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण ही केवळ शासकीय सेवेतून झालेली नाही, तर समाजातील महान नेतृत्वांच्या विचारांतूनही झाली आहे. कै. बाळासाहेब (दादा) शंकरराव देशमुख यांच्या लोकाभिमुख नेतृत्वाचा, आदरणीय साहेबरावजी रामचंद्र नवले यांच्या शिस्तबद्ध कार्यपद्धतीचा आणि राजारामजी बापूसाहेब देशमुख यांच्या समाजहिताच्या विचारांचा त्यांच्या जीवनावर सकारात्मक प्रभाव पडला. या प्रेरणास्थानांकडून त्यांनी समाजासाठी झटण्याची, माणसांशी जिव्हाळ्याने वागण्याची आणि विकासाला सर्वोच्च प्राधान्य देण्याची शिकवण घेतली. त्यामुळे त्यांचे प्रत्येक काम हे केवळ कर्तव्य न राहता लोकसेवेचे माध्यम बनले.

त्यांची कार्यशैली प्रामाणिकपणा, पारदर्शकता, वेळेचे काटेकोर पालन आणि सेवाभाव या मूल्यांवर आधारलेली होती. त्यामुळे कृषी मंत्री तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून त्यांच्या उल्लेखनीय कार्याचा अनेक वेळा गौरव करण्यात आला. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन करणारा, त्यांच्या सुखदुःखात सहभागी होणारा अधिकारी म्हणून त्यांनी विशेष विश्वास संपादन केला.

सेवानिवृत्तीनंतरही त्यांनी समाजसेवेचा ध्यास कायम ठेवला. २०२६ मध्ये त्यांनी श्रमिक दूध संकलन केंद्र, जावळे कडलग या उपक्रमाची स्थापना केली. आज शेकडो दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या सहकार्याने दररोज सुमारे ९२०० लिटर दूध संकलन होत असून, अनेक कुटुंबांना आर्थिक स्थैर्य मिळवून देण्यात हा उपक्रम महत्त्वाची भूमिका बजावत आहे. ग्रामीण भागातील दुग्ध व्यवसायाला बळकटी देत शेतकऱ्यांना स्वावलंबी बनविण्याचा त्यांचा हा प्रयत्न समाजासाठी आदर्श ठरत आहे.

हिरालाल सुर्वे यांचा जीवनप्रवास हा प्रत्येक युवक, अधिकारी आणि शेतकऱ्यासाठी प्रेरणादायी आहे. संकटांवर मात करून निष्ठा, प्रामाणिकपणा आणि सेवाभाव जपला तर यश आपोआप मिळते, हा संदेश त्यांच्या आयुष्यातून स्पष्टपणे मिळतो. त्यांनी आपल्या कार्यातून केवळ एक कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून नव्हे, तर समाजहितासाठी आयुष्य समर्पित करणारा संवेदनशील माणूस म्हणूनही वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या ६४ व्या वर्षात पदार्पणानिमित्त त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, सुख-समृद्धी आणि अखंड समाजसेवेची ऊर्जा लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना. त्यांनी जपलेला सेवाभाव, शिस्त, प्रामाणिकपणा आणि शेतकरीहिताचा वारसा पुढील अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी दीपस्तंभ ठरो, हीच त्यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा.

**संकलन- सुहास सातपुते**
**उपसंपादक, दैनिक युवावार्ता**


सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी

आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
SMBT BANK
✲ कर्ज रक्कम वाढ । ✲ कर्ज व्याजदर कमी । ✲ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता



चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
अत्याधुनिक लॅमिनार शस्त्रक्रिया ऑपरेशन थिएटर
• मेंदुविकार शस्त्रक्रिया • किडनी शस्त्रक्रिया
• खुबा प्रत्योरोपण • मुत्रविकार शस्त्रक्रिया
• गुडघा प्रत्यारोपण • दुर्बिणीद्वारे पोटाच्या व
• पोटाच्या शस्त्रक्रिया • आतड्याच्या शस्त्रक्रिया
२४ तास सुविधांसाठी ०२४२५ - २२४७६२ मोबा. ७०३८२७०३८२



दर्शन टेक्सटाईल मार्केट
सेल नव्हे होलसेल सेल
30% ते 70% डिस्काउंट
शालू | कांजीवरम | सिल्क पैठणी | बनारसी
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर 422605



अविवाहित, नवविवाहित, चाळीशिनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या
स्त्रियांच्या समस्या
मासिक पाळीच्या तक्रारी ♦ योनी मार्गाची दुर्गंधी
अंगावरून पांढरे जाणे ♦ गुप्त अंगाला खाज
गर्भ न रहाणे ♦ विविध त्वचा विकार
वारंवार गर्भपात होणे ♦ गुप्तरोग, गर्मी
गर्भाशयात गाठी ♦ लघवीला जळजळ
गर्भाशयाचा कर्करोग ♦ संभोगात रस न येणे
♦ स्तनांची वाढ न होणे ♦ संभोगा विषयीची भीती
♦ स्तनातून दूध न येणे ♦ हस्तमैथूनाची सवय
♦ स्तनात गाठी ♦ लैंगिक विकृती
♦ स्तनाचा कर्करोग ♦ मानसिक नैराश्य
डॉ. मोना अभय मुथा
B.H.M.S., C.G.O., D.Ac
होमिओपॅथिक कन्सल्टंट स्त्री रोग चिकित्सक
( ३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव )
1 लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार ISO मानांकन प्राप्त
डॉ. मुथाज् होमिओपॅथिक क्लिनिक विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर
www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13



कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६



दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
ताम्हाणे हॉस्पिटल
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०






# हयातीच्या दाखल्यासाठी वृद्धांची दमछाक

## हजारो ज्येष्ठ नागरीक, विधवा आणि दिव्यांग लाभार्थी अडचणीत



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शासनाच्या विविध सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ घेणाऱ्या ज्येष्ठ नागरिक, विधवा महिला आणि दिव्यांग लाभार्थ्यांना दरवर्षी 'हयातीचे प्रमाणपत्र' सादर करणे बंधनकारक आहे. मात्र ही प्रक्रिया अनेक लाभार्थ्यांसाठी डोकेदुखी ठरत असून, जिल्ह्यातील तब्बल ७० हजार ७८९ लाभार्थ्यांनी अद्याप हयातीचे प्रमाणपत्र सादर केलेले नाही. त्यामुळे या लाभार्थ्यांचे ऑगस्ट महिन्यापासून अर्थसाहाय्य बंद होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना आणि दिव्यांग कल्याण योजनांअंतर्गत एकूण २ लाख १२ हजार ८२३ लाभार्थी आहेत. यापैकी १ लाख ४२ हजार ३४ लाभार्थ्यांनी 'लाभार्थी सत्यापन ॲप'द्वारे हयातीचा दाखला सादर केला आहे. मात्र उर्वरित लाभार्थ्यांनी अद्याप सत्यापन पूर्ण केले नसल्याने प्रशासनाने त्यांच्या अनुदानावर गंडांतर येण्याचा इशारा दिला आहे.

या योजनांअंतर्गत संजय गांधी व श्रावणबाळ योजनेच्या लाभार्थ्यांना दरमहा १,५०० रुपये, तर दिव्यांग लाभार्थ्यांना २,५०० रुपये इतके मासिक अर्थसाहाय्य दिले जाते. मात्र हयातीचे प्रमाणपत्र वेळेत सादर न केल्यास ऑगस्टपासून हे अर्थसाहाय्य थांबविण्यात येणार असून, २०२७ पर्यंतही प्रमाणपत्र सादर न केल्यास संबंधित लाभार्थ्यांना योजनेसाठी नव्याने अर्ज करावा लागणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

पूर्वी हयातीचे प्रमाणपत्र तहसील कार्यालय, पंचायत समिती किंवा इतर शासकीय कार्यालयातून सहज उपलब्ध होत होते. आता जिल्हाधिकारी कार्यालयाने विकसित केलेल्या 'लाभार्थी सत्यापन ॲप' च्या माध्यमातून घरबसल्या प्रमाणपत्र सादर करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. मात्र प्रत्यक्षात अनेक ज्येष्ठ नागरिकांकडे स्मार्टफोन नाही, इंटरनेटचा वापर करता येत नाही किंवा ऑनलाइन प्रक्रिया समजत नाही. त्यामुळे ही सुविधा अनेकांसाठी गैरसोयीची ठरत आहे.

विशेष म्हणजे या योजनांचा लाभ घेणारे बहुतांश लाभार्थी हे वृद्ध, निराधार, विधवा किंवा दिव्यांग असल्याने त्यांना वारंवार हयातीचा दाखला, आधार, बँक खाते व इतर कागदपत्रे जमा करण्यासाठी सरकारी कार्यालये किंवा सेवा केंद्रांच्या फेऱ्या माराव्या लागतात. यासाठी त्यांना आर्थिक खर्चासह मानसिक व शारीरिक त्रासही सहन करावा लागत आहे. अनेक ठिकाणी योग्य मार्गदर्शनाचा अभाव असल्याने पात्र लाभार्थी केवळ कागदपत्रांच्या पूर्ततेअभावी योजनांपासून वंचित राहत असल्याची खंत व्यक्त होत आहे.

सामाजिक सुरक्षा योजनांचा उद्देश गरजू नागरिकांना आधार देण्याचा असताना, ऑनलाइन प्रक्रियेतील अडथळे आणि वारंवारच्या कागदपत्रांच्या अटींमुळे अनेक वृद्ध नागरिकांची अक्षरशः पिळवणूक होत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शासनाने ग्रामपातळीवर विशेष शिबिरे आयोजित करणे, घरोघरी जाऊन सत्यापन करणे, तसेच ज्येष्ठ नागरिकांना सुलभ आणि सन्मानजनक पद्धतीने सेवा उपलब्ध करून देणे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

ज्येष्ठ नागरिकांना शासनाच्या योजनांचा लाभ अखंडित मिळावा यासाठी प्रशासनाने दंडात्मक भूमिका घेण्याऐवजी मदत, मार्गदर्शन आणि सुलभ सेवा यावर भर देण्याची आवश्यकता असल्याचे मत सामाजिक क्षेत्रातून व्यक्त केले जात आहे.

# शिर्डी लोकसभेच्या जिल्हा संघटकपदी ॲड. अमोल बोऱ्हाडे



## पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याकडून जबाबदारी

**शिर्डी लोकसभा जिल्हा संघटकपदाची महत्त्वाची जबाबदारी माझ्यावर सोपवून वरिष्ठांनी विश्वास दाखविला आहे. हा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी मी पूर्ण क्षमतेने काम करणार आहे. मतदारसंघातील प्रत्येक गावात संघटना मजबूत करण्यावर भर देणार असून युवकांना मोठ्या प्रमाणात पक्षाशी जोडण्याचा प्रयत्न करणार आहे. त्यादृष्टीने शाखा सुरू करण्यासाठी विशेष अभियान राबविण्यात येईल. पक्षवाढ, जनसंपर्क आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने काम करणे, हेच माझे प्राधान्य असेल.**

**ॲड. अमोल बोऱ्हाडे (जिल्हा संघटक)**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - येथील युवा उद्योजक ॲड. अमोल बोऱ्हाडे यांची शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या शिर्डी लोकसभा जिल्हा संघटकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीमुळे अकोले, संगमनेरसह संपूर्ण शिर्डी लोकसभा मतदारसंघातील ठाकरे सेनेचे पदाधिकारी, शिवसैनिक आणि समर्थकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

शिर्डीचे खा. भाऊसाहेब वाकचौरे यांनी काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केला. त्यानंतर त्यांचे नातू ॲड. अमोल बोऱ्हाडे यांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात प्रवेश केला. शिर्डी येथे त्यांनी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. पक्षनिष्ठा, संघटन कौशल्य आणि युवकांमधील सक्रिय कामाची दखल घेत पक्षप्रमुख ठाकरे यांनी बोऱ्हाडे यांच्यावर शिर्डी लोकसभा जिल्हा संघटकपदाची जबाबदारी सोपविली आहे. या नियुक्तीमुळे आगामी काळात अकोले, संगमनेरसह संपूर्ण शिर्डी लोकसभा मतदारसंघात पक्षसंघटना अधिक मजबूत होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. या निवडीबद्दल पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, युवा नेते आदित्य ठाकरे, खा. संजय राऊत यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.




# दिवाळी नंतर ग्रामपंचायती निवडणूकांची रणधुमाळी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - जानेवारी २०२४ ते डिसेंबर २०२६ या कालावधीत मुदत नव्याने संपणाऱ्या तसेच स्थापन झालेल्या अहिल्यानगर जिल्ह्यातील ८४३ ग्रामपंचायतींची प्रभाग आरक्षण प्रक्रिया पूर्ण झाली आहे. जाहीर केलेल्या आरक्षणावरील हरकतींचा निपटारा करून १० जुलै रोजी आरक्षण अंतिम करण्यात आले. आता संबंधित ग्रामपंचायतींच्या मतदार यादी कार्यक्रमाकडे सर्वांचे लक्ष लागले असून महिनाअखेर हा कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे यंदा दिवाळीदरम्यानच ८४३ ग्रामपंचायतींच्या निवडणुकीची खऱ्या अर्थाने रणधुमाळी रंगणार आहे.

प्रक्रिया त्यावर घेऊन जिल्हा ग्रामपंचायत निवडणूक विभागाकडून मागील आठवड्यात आरक्षण सोडतीची पार पडल्यानंतर, १५७ हरकती नोंदवण्यात आल्या होत्या. या हरकतींवर उपविभागीय अधिकाऱ्यांनी सुनावणी अहवाल जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केला. जिल्हाधिकाऱ्यांनी ८ जुलै रोजी अंतिम निर्णय घेत १० जुलैला जिल्ह्यातील ८४३ ग्रामपंचायतींचे आरक्षण निश्चित केले. ८४३ ग्रामपंचायतींचे प्रारूप आरक्षण जाहीर केल्यानंतर ३३ ठिकाणी एकूण आरक्षण ५० टक्क्यांहून अधिक झाल्याचे निदर्शनास आले होते. त्यामुळे नियमानुसार तेथे फेरआरक्षण काढून ते १३ जिल्हाधिकारी जुलै रोजी अंतिम करण्यात आल्याचे कार्यालयाच्या ग्रामपंचायत विभागाकडून सांगण्यात आले. यात संगमनेरमधील ३, कर्जत १८, राहुरी ४ आणि श्रीरामपूरमधील ८ अशा ३३ ग्रामपंचायतींचा समावेश आहे.

**मतदार यादीची प्रतिक्षा असणाऱ्या ग्रामपंचायती-**

**संगमनेर ९४, कोपरगाव २९, पाथर्डी ७९, अकोले ५२, श्रीरामपूर २७, राहाता २५, राहुरी ४४, नगर ६०, नेवासा ५९, शेवगाव ४८, कर्जत ५५, जामखेड ४९, पारनेर ८८, श्रीगोंदा ६२ आदी.**

# आता डिझाइन करिअरसाठी पुणे-मुंबईची गरज नाही

**SILICA Institute ची संगमनेरमध्ये शाखा सुरू**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - डिझाइन क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आता पुणे किंवा मुंबई गाठण्याची गरज उरणार नाही. भारतातील आघाडीची डिझाइन प्रवेश परीक्षा मार्गदर्शन संस्था ***SILICA Institute*** ची शाखा आता संगमनेरमध्ये सुरू होत असून, येथील विद्यार्थ्यांना आपल्या शहरातच दर्जेदार मार्गदर्शन उपलब्ध होणार आहे.

प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक अरविंद वैद्य यांच्या कन्या सिद्धी वैद्य यांच्या पुढाकारातून ही शाखा सुरू होत आहे. विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलता, वेगळा विचार करण्याची क्षमता आणि कल्पनाशक्तीला योग्य दिशा देण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार आहे. डिझाइन क्षेत्रातील विविध करिअर संधी, प्रवेश परीक्षा आणि व्यावसायिक मार्गदर्शन विद्यार्थ्यांना आता संगमनेरमध्येच मिळणार आहे.

या शाखेच्या उद्घाटन सोहळ्याचे आयोजन बुधवार, दि. १५ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता करण्यात आले आहे. हा कार्यक्रम सूर्या शॉपिंग कॉम्प्लेक्स, ऑरेंज कॉर्नर, संगमनेर येथे होणार आहे.

या उद्घाटन सोहळ्यास नागरिक, विद्यार्थी, पालक तसेच शिक्षणप्रेमींनी सहकुटुंब उपस्थित राहून सिद्धी वैद्य यांच्या या नव्या शैक्षणिक उपक्रमाला शुभेच्छा व प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन अरविंद वैद्य आणि सौ. संज्योत वैद्य यांनी केले आहे.

